दैनिक
● छ.संभाजीनगर, बीड, जालना, नांदेड, परभणी, धाराशिव, लातूर ●
# मराठवाडा पत्र
संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे
मंगळवार
४.२.२०२५
वर्षे : ४ अंक : २९८
किंमत : ३ रू. पाने : ४
marathwadapatra.com dailymarathwadapatra2021@gmail.com RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post : Reg.No. L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob : 9822152955


श्री.गंगाभारती कृपा
मो.7038389999
आदित्य
फर्निचर मॉल
छत्रपती संभाजी महाराज चौक,बार्शी रोड,बीड






# कसचे काय नि कसचे काय!



''कारखानदारीत (मॅन्युफॅक्चरिंग) चीन ही जगातील एकमेव महासत्ता आहे'', असे प्रमाणपत्र देशाचे मुख्य आर्थिक सल्लागार अनंत नागेश्वरन यांनीच खुद्द दिले ते उत्तम झाले. तेदेखील २०२५ चा अर्थसंकल्पपूर्व आर्थिक पाहणी अहवाल सादर करताना. हा उल्लेख का आवश्यक त्याचे स्पष्टीकरण पुढे मिळेल; पण नागेश्वरन यांच्या या कबुलीमुळे 'भारत-चीन जगाचे सामुदायिक नेतृत्व करणार', 'चीन-भारत आर्थिक सहकार्य जगास नवी दिशा देईल' वगैरे भगतगणांच्या समाजमाध्यमी पोपटपंचीस आता विराम मिळेल. आर्थिक पाहणी अहवालाचा उल्लेख येथे आवर्जून केला कारण गेल्या वर्षी असाच आर्थिक पाहणी अहवाल सादर करताना नागेश्वरन यांनी भारताच्या 'चीन प्लस वन' धोरणाची भली मोठी भलामण केली होती. म्हणजे त्यावेळी चीनमधून बाहेर पडत असणाऱ्या कंपन्या भारतात आपली कारखानदारी सुरू करतील, ही आशा. ती आशेच्या पातळीवरच राहिली कारण त्यासाठी जे काही करणे आवश्यक होते ते सरकारने केले नाही आणि दुसरे म्हणजे चीनमधून अपेक्षेइतक्या संख्येने कंपन्या बाहेर पडल्याच नाहीत. हे स्वत:च्या यशासाठी भाजपच्या अपयशाकडे डोळे लावून बसलेल्या काँग्रेसप्रमाणे झाले. चीन अपेक्षा होती तितका वाईट ठरला नाही आणि परिणामी आपल्यालाही अपेक्षेइतके यश मिळवता आले नाही. सबब यापुढे चीन आणि भारत हे जणू एकमेकांचे प्रतिशब्द असल्यासारखे उल्लेख करायची गरज नाही. ताजा आर्थिक पाहणी अहवाल या प्रश्नावर पडदा टाकतो. आणि तो टाकत असताना आपण काय काय करू शकलो नाही, याचीही जंत्री सादर करतो. इतका प्रामाणिकपणा दाखवल्याबद्दल नागेश्वरन यांचे आभार मानून या अहवालाची दखल घेणे आवश्यक ठरते. कारण हे अधिवेशन सुरू होण्यापूर्वी पंतप्रधानांनी भारत २०४७ सालापर्यंत विकसित इत्यादी झाला असेल अशी द्वाही फिरवली. ते वर्ष भारतीय स्वातंत्र्याच्या शताब्दीचे. त्यामुळे पंतप्रधानांस हा मुहूर्त गाठण्याची इच्छा असणार. त्यात गैर काही नाही. पण तो मुहूर्त गाठावयाचा असेल तर सरकारी आणि बिगरसरकारीही तज्ज्ञांच्या मते भारतास अर्थविकासाचा दर किमान नऊ टक्के इतका राखावाच लागेल. नागेश्वरन शुक्रवारी म्हणाले की हा दर आठ टक्के तरी हवाच पण त्याबरोबर गुंतवणुकीचा दरही वर्षाला ३५ टक्के इतका हवा. शिवाय आजपासून २०३० पर्यंत दर वर्षाला ७८.५० लाख बिगरकृषक रोजगार आपल्याला दर वर्षी निर्माण करावे लागतील. नागेश्वरन यांचा आर्थिक पाहणी अहवाल तर सांगतो की आपली यंदाची विकास गती जेमतेम ६.३ ते फार फार तर ६.८ टक्के इतकीच असेल. आपली अपेक्षा होती साधारण आठ टक्क्यांची. ती पूर्ण करणे राहिले दूर; आपली अर्थगती त्यापेक्षाही दोन टक्के कमीच असेल. यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले ताट 'लोअर मिडल इन्कम' देशांच्याच पंगतीत मांडले जाणार. दुर्दैव असे की आपण समजा खरोखरच ही गती नऊ टक्क्यांवर नेली तरी आपली वर्णी मिडल इन्कम गटातच लागणार. याचा अर्थ असा की आपणास किमान नऊ टक्के तरी विकास दर राखणे क्रमप्राप्त. आणि आजचा आर्थिक अहवाल तर सात टक्क्यांची मर्यादाही ओलांडताना दिसत नाही. या पार्श्वभूमीवर आर्थिक पाहणी अहवालात नसलेले एक सत्य सर्वांस मान्य करण्याखेरीज पर्याय नाही. ते आहे अर्थविकासाच्या अधिकतम गतीचे. तो काल २००४ ते २०१३ हा होता आणि त्या कालखंडात देशाने सर्वाधिक गुंतवणूक अनुभवली. अधिकृत आकडेवारीनुसार देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या ३४ टक्के इतकी गुंतवणूक त्या दशकात झाली तर नंतरच्या दशकात तीत १४ टक्के इतकी घसरण होऊन गुंतवणूक २९ टक्क्यांवर आली. या काळात- म्हणजे सद्या:स्थितीत- सरकारच्या डोक्यावरील कर्जही ८२ टक्क्यांवर गेले असून याबाबतच्या ६० टक्के इतक्या मर्यादेपेक्षा ते किती तरी अधिक आहे. अशा वेळी नागेश्वरन अधिक अर्थगतीसाठी जे काही उपाय सुचवतात ते अनेकार्थी सूचक ठरतात. उदाहरणार्थ 'डीरेग्युलेट'- म्हणजे सरकारी नियंत्रण मुक्ती- हा त्यांचा पहिला सल्ला. तो त्यांना विद्यामान सत्ताधीशांच्या दशकपूर्तीनंतरही द्यावा लागतो, यातच काय ते आले. यानिमित्ताने 'मिनिमम गव्हर्न्मेंट, मॅक्झिमम गव्हर्नन्स' या विद्यामान सरकारच्या एकेकाळच्या लाडक्या घोषणेचे काय झाले, याचे स्मरण उचित ठरेल. वास्तविक या सत्ताधीशांनी कॉर्पोरेट टॅक्समध्ये भरभक्कम सवलती देऊन झाल्या, अर्थमंत्रीबाईंनी अनेक उद्योगपतींना आवाहन करून झाले. तरीही उद्योगविश्व मात्र ढिम्मच. ते काही गुंतवणूक करण्यास तयार नाही. याचे कारण नागेश्वरन यांना आजही नमूद करावे लागते ते या नियंत्रण मुक्तीच्या गरजेत आहे. सरकार आपली पकड सोडायला तयार नाही. नागेश्वरन यांना हे वास्तव माहीत नसणे अशक्य. त्यामुळे सरकारी मर्यादेच्या चौकटीत रास्त तितके ते व्यक्त होतात. अलीकडेच त्यांनी आपली सरकारी धोरणे कारखानदारीचा कसा गळा घोटत आहेत, ते बोलून दाखवले. उद्योजकांचे जमीन हस्तांतरणातच इतके रक्त आटते की उद्योग सुरू व्हायच्या आधीच ते गलितगात्र होतात. ही प्रक्रिया सोपी, सुलभ करण्याची गरज नागेश्वरन व्यक्त करतात आणि आजही अधिकृत पाहणी अहवालात हा मुद्दा आणतात. 'भारताने गुंतवणूक आकर्षित करणे आणि कारखानदारी उभी राहणे यात स्पर्धात्मकता वाढवायला हवी. त्यासाठी मूलभूत सुधारणांची गरज आहे', असे हा अहवाल सांगतो. या विधानाचाच दुसरा अर्थ 'अद्याप सुधारणा प्रक्रिया सुरू झालेली नाही', असा असतो. खासगी क्षेत्राने देशाच्या प्रगतीत अधिक जोमाने पुढे यायला हवे, असेही ते सुचवतात. पण हा उपचार असावा. कारण हे उद्योजक हातावर हात ठेवून का बसून आहेत याच्या कारणांचा ऊहापोह खुद्द नागेश्वरन यांनीच केलेला आहे. त्यामुळे नंतरचे विधान सरकारी कानांस मंजूळ वाटावे यासाठी असणार. या अहवालात कोणत्या राज्यात किती टक्के प्रदेश हागणदारीमुक्त झाला, याचा तपशील आहे. त्याचे प्रयोजन कळत नाही. याचे कारण संपूर्ण देश असा 'खुले शौचमुक्त' झाल्याची घोषणा खुद्द पंतप्रधानांनीच काही वर्षांपूर्वी केली होती. पंतप्रधानांनी केलेली असल्याने ती असत्य असणार नाही; तेव्हा त्या घोषणेनंतर पुन्हा गावोगाव हागणदाऱ्या तयार होऊ लागल्या काय, याचा उल्लेख या अहवालात असता तर प्रबोधन झाले असते. दुसरा महत्त्वाचा आणि आवर्जून दखल घ्यायलाच हवा असा मुद्दा म्हणजे पर्यावरण आणि त्याबाबतच्या संरक्षणाचे उपाय हा. आजचा आर्थिक पाहणी अहवाल या मुद्द्यावर भारतास अत्यल्प परदेशी मदत येते असा तक्रारीचा सूर लावतो. तोही अनाकलनीय. कारण अनेक परदेशी संस्थांकडून पर्यावरण संवर्धनादी कारणांसाठी येणाऱ्या देणग्या याच सरकारने तर बंद केल्या. असे असताना आता परदेशांतून आर्थिक मदत येत नाही, असा गळा काढण्यात काय हशील? पर्यावरण, कृत्रिम प्रज्ञा या मुद्द्यांवरील भविष्यातील आव्हानांचा उल्लेख या अहवालात आहे. 'या संदर्भात योग्य ते धोरण नसणे हे बेरोजगारीस चालना देणारे ठरू शकते' असा इशारा हा अहवाल देतो. आपल्याकडे या मुद्द्याबाबत जाग येत असताना चीनने अलीकडेच स्वत:ची कृत्रिम प्रज्ञा प्रणाली थेट बाजारात आणून साऱ्या जगाला दिलेला धक्का अद्यापही ताजा आहे. असो. आपल्या भविष्याबाबत नागेश्वरन यांचे शेवटचे विधान अत्यंत मोलाचे म्हणावे लागेल ''यापुढे 'बिझनेस ॲज यूज्वल' चालणार नाही,'' असे ते म्हणतात. म्हणजे 'चलता है' दृष्टिकोन सोडून आपणास निर्णय प्रक्रिया गतिमान करावी लागेल. पण हा सल्ला इतरांस देऊन उपयोग नाही. याची सुरुवात 'वरून'च व्हायला हवी. ती होणार नसेल तर या अहवालावर 'कसचे काय नि कसचे काय', इतकेच म्हणणे रास्त.

# फरार आरोपीने जर पुरावे नष्ट केले तर जबाबदारी प्रशासनाची-धनंजय देशमुख

बीड, (प्रतिनिधी): – पुरावे नष्ट करण्यासाठीच गेली दोन महिने आरोपी फरार आहे. यात जर काही पुरावे नष्ट करण्यात आले तर त्यांची जबाबदारी ही यंत्रणे आणि प्रशासनाची असेल असे धनंजय देशमुख यांनी म्हटले आहे.आमचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर पूर्ण विश्वास त्यांनी आम्हाला न्याय द्यावा. धनंजय देशमुख पुढे बोलताना म्हणाले की, आम्ही कालच महंत नामदेव शास्त्री यांची भगवानगडावर जात भेट घेतली. आमच्या गावात दोन टक्क्यांहून कमी गुन्हेगारी असल्याने आमच्या संपूर्ण गावाला पोलिसांकडून प्रमाणपत्र भेटले आहे. हे पहिलेच मोठे प्रकरण आहे. यामुळे गावाला राजकारणाचा काय अनूभव असणार आहे. धनंजय देशमुख म्हणाले की, संतोष देशमुख यांना न्याय मिळावा यासाठी आमच्यासोबत जी लोकं आहेत, त्यांना या राजकारणाचा अनुभव आहे. म्हणून विचारपूर्वक हे वक्तव्य केले असणार, असे त्यांनी लोकप्रतिनिधींकडून धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याच्या मागणीवर बोलताना म्हटले आहे. तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर आमचा विश्वास आहे, त्यांनी या गोष्टीचे गांभीर्य लक्षात घेत जबाबदारी घेत आम्हाला न्याय द्यावा, असेही त्यांनी म्हटले आहे. नामदेव शास्त्रींची भेट घेत धनंजय देशमुखांनी सांगितले की, देशमुख कुटुंबाने जातीवाद केला असता तर त्यांच्या हत्येनंतर दिसले असते. माझा भाऊ दलित बांधवाला वाचवण्यासाठी गेला होता. आमची कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही. आरोपींवर आतापर्यंत अनेक गुन्हे दाखल झालेले आहेत. आरोपींची मानसिकता तपासण्याची गरज आहे. ज्याला आरोपींची बाजू घ्यायची त्यालाच जातीयवादाचा अंश येत आहे. आम्ही सर्व दाखवले आहे. यांच्या कार्यालयात बसायचे. त्यांच्या गाडीत फिरायचे. संतोष देशमुख यांची अतिशय क्रूर हत्या झाली आहे. प्रत्येक क्षेत्रातील लोक आपल्यासोबत आहे. राजकीय नेते, संप्रदायाचे लोक, सामाजिक कार्यकर्ते, आमच्यासोबत आहेत. न्यायाच्या भूमिकेत आहेत. अशावेळी लोकप्रतिनिधींना जातीयवादी म्हणू नका. नाही तर ते कोणत्याच न्यायाच्या भूमिकेत येणार नाही. न्याय मागणाऱ्या लोकप्रतिनिधींना चुकीचे ठरवू नका. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील एकमेव फरार आरोपी कृष्णा आंधळे याला बीड पोलिसांनी वॉन्टेड म्हणून घोषित केले आहे. सरपंच देशमुख यांची गत ९ डिसेंबर रोजी हत्या झाली होती. त्यानंतर या प्रकरणी जयराम चाटे, महेश केदार, प्रतीक घुले, विष्णू चाटे, सुदर्शन घुले, कृष्णा आंधळे, सुधीर सांगळे या ७ जणांवर हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणी कृष्णा आंधळे वगळता सर्वांना बेड्या ठोकण्यात आल्यात. पण आंधळे अजूनही पोलिसांच्या हाती लागला नाही. पोलिस त्याचा कसून शोध घेत आहेत.



# एकनाथ शिंदे पुन्हा नाराज? फडणवीसांच्या बैठकीला दांडी

मुंबई, (वृत्तसेवा):- राज्यात पुन्हा एकदा महायुतीचं सरकार सत्तेमध्ये आलं, महायुतीला प्रचंड बहुमत मिळालं. भाजप हा राज्यात सर्वात मोठा पक्ष ठरला. मात्र गेल्यावेळी देवेंद्र फडणीस हे उपमुख्यमंत्री होते. तर एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री होते. यावेळी देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री आहेत तर एकनाथ शिंदे त्यांच्या मंत्रिमंडळामध्ये उपमुख्यमंत्री आहेत. नव्या मंत्रिमंडळाच्या शपथविधीपूर्वी एकनाथ शिंदे हे नाराज होते, त्यामुळे ते आपल्या मुळगावी दरेगावला गेल्याची चर्चा रंगली, त्यानंतर पालकमंत्रिपदावरून देखील एकनाथ शिंदे नाराज झाल्याची माहिती समोर आली होती, त्यावेळी देखील ते दरेगावला गेले होते. दरम्यान आता पुन्हा एकदा एकनाथ शिंदे हे नाराज असल्याची चर्चा सुरू झाली आहे, त्याचं कारण देखील समोर आलं आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यंनी बोलावलेल्या कॅबिनेट बैठकीला उपस्थित नव्हते. त्यानंतर आता त्यांनी फडणवीसांनी बोलावलेल्या आणखी एका महत्त्वाच्या बैठकीला दांडी मारली आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे हे पुन्हा एकदा नाराज असल्याच्या चर्चेला उधाण आलं आहे. काही महत्त्वाच्या प्रकल्पांवर चर्चा करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बैठक बोलावली होती. या बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित होते. मात्र एकनाथ शिंदे या बैठकीला हजर नव्हते. एकनाथ शिंदे यांच्या पक्षाच्या वतीनं गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी या बैठकीला हजेरी लावली. दरम्यान यापूर्वी देखील पालकमंत्रिपदाच्या वाटपावरून एकनाथ शिंदे यांनी नाराजी व्यक्त केली होती. दादा भुसे आणि भरत गोगावले यांना पालकमंत्रिपद मिळावं अशी एकनाथ शिंदे यांची इच्छा होती.

पान ४ वरून

### खा.सोनवणेंनी काढले...

जलदगती रेल्वेची चाचणी होत आहे. बीडला रेल्वे आलीच पाहिजे, ही घोषणा बीडकर कायम देत. त्यासाठी केवळ घोषणा दिल्या नाही तर रस्त्यावर लढा दिला. वेळप्रसंगी पोलीसांच्या काठ्या खाल्ल्या आणि जेलही भोगले. याच संघर्षातून सन १९९५ मध्ये अहिल्यानगर ते परळी रेल्वे मार्गाला मंजूरी मिळाली. पुढे अनेक वर्षे बीड रेल्वे केवळ मंजूरीच्या स्थितीत होती. मागील काही वर्षात चार दोन वर्षात पाच दहा किलोमिटरने रेल्वेचे काम पुढे सरकत होते. मागील कालावधीत ही रेल्वे अंमळनेर पर्यंत येऊन थांबली होती. रेल्वे मार्गातील भुसंपादन आणि मावेजाचे अनेक विषय प्रलंबित होते.लोकसभा निवडणूकी मधे खा.बजरंग सोनवणे यांनी विजयी झाल्यानंतर पहिली बैठक रेल्वेची घेत, रेल्वे ही बीडकरांचे स्वप्न आहे ते पुर्ण करण्यासाठी रात्रंदिवस यंत्रणा राबविण्याच्या सुचना दिला. केवळ सुचना देऊन न थांबता भुसंपादन आणि मावेजाचे प्रकरणे मार्गी लावण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. अवघ्या सहा ते सात महिन्यात आता अंमळनेर ते बीड असा रेल्वेचा प्रवास सुरू आहे. दि.३०-३१ डिसेंबर रोजी विघनवाडी ते नवगन राजुरी या नवीन लोहमार्गाची चाचणी घेण्यात आली. पहिल्या बैठकीतच दि.२६ जानेवारीपर्यंत बीडला रेल्वे येईल, असे सांगितले होते. परंतु पालवन परिसरात दोन शेतकऱ्यांचे मावेजाचे प्रकरण प्रलंबित होते. सदरील शेतकऱ्यांना मावेजा मिळून त्या जागेचा ताबा मिळावा, यासाठी खा.सोनवणे यांनी प्रयत्न केले. यानंतर आता रेल्वेमार्गातील भुसंपादनाचा गतिरोधक निघालेला असून दिलेल्या मुदतीपेक्षा दहा दिवसात रेल्वे बीडला येत आहे.

### मुख्यमंत्री देवेंद्र...

जिल्ह्यातील मंत्री आणण्याची आमची क्षमता नाही, पण जिल्ह्यातील दोन्ही मंत्र्यांची नावं पत्रिकेवर आहेत, असे सुरेश धस यांनी म्हटलं. या कार्यक्रमानंतर मच्छिंद्रनाथाच्या समाधीवर मुख्यमंत्री दर्शनासाठी येणार आहेत. यावेळी, १० कोटी रुपयांच्या गाभाऱ्याचा शुभारंभ करणार आहेत, असेही धस यांनी म्हटले.

### गावकारभाऱ्यांना...

जिल्हाधिकाऱ्यांनी कठोर निर्णय घेत सदस्यत्व रद्द केले. ग्रामपंचायत निवडणुकीसाठी उमेदवारांना कमीच किमान ५ वर्षांची मेहनत घ्यावी लागते. गावकऱ्यांच्या सुख-दुःखात सहभागी होऊन, स्वतःच्या खिशातून पैसे खर्च करून गावातील कामे करावी लागतात. निवडणुकीच्या काळात मोठ्या प्रमाणात आर्थिक खर्च केला जातो. मात्र, निवडून आल्यावर जात वैधता प्रमाणपत्र मिळवण्यात अडचणी आल्याने अनेकांचे सरपंच व सदस्यत्व रद्द होत आहे. परिणामी उमेदवारांनी केलेला खर्च आणि परिश्रम वाया जात आहेत. ज्या सरपंच आणि सदस्यांचे सदस्यत्व रद्द झाले आहे, त्यांच्यासाठी जिल्हा प्रशासनाने सुनावणीची प्रक्रिया सुरू ठेवली आहे. ज्या उमेदवारांना आक्षेप नोंदवायचा आहे, त्यांना आपल्या कागदपत्रांसह दावे मांडण्याची संधी मिळणार आहे. या मोठ्या कारवाईमुळे बीड जिल्ह्यातील ७ तालुके आणि अनेक ग्रामपंचायतींमध्ये राजकीय उलथापालथ होण्याची शक्यता आहे. या निर्णयामुळे भविष्यात ग्रामपंचायत निवडणुकीत सहभागी होणाऱ्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र वेळेत मिळवण्याची जबाबदारी अधिक वाढली आहे.

### चंपावती महोत्सव...

कलंत्री प्रमुख पाहुणे होते तर उदघाटक जेष्ठ कलाकार भरत अण्णा लोळगे उपस्थित होते. याबरोबरच दै दिव्य लोकप्रभाचे संपादक संतोष मानूरकर, दै वास्तवचे संपादक जितेंद्र सिरसाठ, कलाकार किशोर धुताडमाल, जतीन

पान ४ वरून

वाघामारे, सोनल नहार, संस्कार भरतीचे प्रमोद वझे, बाळू सौंदतिकर यांच्यासह असंख्य कलाकार उपस्थित होते. शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर आणि चंपावती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष प्रतिक कांबळे या तिघांनी मिळून सर्व मान्यवरांचे सत्कार करून आपल्या भाषणात स्पर्धेत सहभागी झालेल्या कलाकारांना शुभेच्छा दिल्या. काल दि. ३ रोजी समूह नृत्य मराठी माध्यम इयत्ता ४ थी ते दहावी वयोगटाच्या समूह नृत्य स्पर्धा पार पडल्या. याबरोबरच एकपात्री अभिनय स्पर्धा देखील संपन्न झाली. ❊बाल कलाकारांचा चंपावती महोत्सव कायम सुरु ठेऊ- जगताप, मुळूक, गलधर : बीड रंगभूमीला कलेचा मोठा वारसा लाभलेला आहे. हा कलेचा वारसा टिकवून ठेवण्यासाठी कलाकारांना पाठबळ देण्याचा आमचा निर्धार पक्का आहे. निवडणूक आणि राजकारणासाठी आम्ही चंपावती महोत्सव आयोजित करत नाहीत आणि कधी करणार नाहीत. बीडमध्ये प्रतिभासंपन्न कलाकार तयार होत राहावेत आणि कलाकारांचा बालेकिल्ला बीड जिल्हा ही ओळख अबाधित राहावी यासाठी आम्ही प्रतवर्षी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खासदार डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या वाढदिवसाचे अवचित्त साधून बीडमध्ये चंपावती महोत्सव आयोजित करत राहणार आहोत असे मत शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक, स्वप्नील भैय्या गलधर यांनी व्यक्त केले.

### कृष्णा आंधळे...

यांनी स्पष्ट केले. संतोष देशमुख खून प्रकरणातील आरोपी कृष्णा आंधळे हा फरारी झाला आहे. तो पुरावा नष्ट करत आहे, अशी शंका धनंजय देशमुख व्यक्त करीत आहेत. त्यावर बोलताना सुरेश धस (डीशीह उहरी) यांनी कृष्णा आंधळेची हिस्ट्रीच काढली आहे. धनंजय देशमुख यांनी व्यक्त केलेली शंका खरी आहे, त्याचाही तपास पोलिसांनी केला पाहिजे, असेही धस यांनी सांगितले. धस म्हणाले, संतोष देशमुख खून प्रकरणाचा तपास करणाऱ्या यंत्रणेसोबत मी सतत बोलत आहे. पण, कृष्णा आंधळेला घराबद्दल, कुटुंबाबद्दल कसलीही आस्था नाही. कारण त्याची हिस्ट्रीच तशी सांगते आहे. त्याला कोणाबद्दलही प्रेम नाही. ते निघालं की, कुठंही एकटंच निघतं, तसं ते गेलेलं आहे. जाऊन जाऊन ते कुठं जाणार आहे, पोलिस आणि सीआयडी तपासाच्या बाहेर तो जाऊच शकत नाही. धनंजय देशमुख यांचा त्रागा रास्त आहे. मी धनंजय देशमुख आणि महादेव मुंडेंच्या कुटुंबासोबत आहे. मी आजच तेथील डीवायएसपीशी बोललो आहे, त्यांनी तपास सुरू असल्याचे सांगितले आहे. याशिवाय एसपींनी त्यांना एलसीबीचेही काही सहकारी तपासासाठी दिले आहेत. महादेव मुंडेंचे मारेकरीसुद्धा लवकर सापडले पाहिजेत. त्याच्या मुलाच्या डोळ्यातील पाणी पाहून माझाही प्रचंड संताप झालेला आहे, त्यामुळे त्याला न्याय मिळणे गरजेचे आहे, असेही सुरेश धस यांनी स्पष्ट केले. कोरोना काळात बीड जिल्ह्यात काय गोंधळ घातला आहे, हे सर्व पुढे आले पाहिजे. सध्या तेलबियासंदर्भात काही कागदपत्रं माझ्याकडं आली आहेत. पण, माझा कार्यक्रम असल्यामुळे काही दिवसांनंतर त्यावर मी बोलणार आहे. संतोष देशमुख खून प्रकरणावरून मीडियाचे लक्ष दुसरीकडे वळू नये; म्हणून मी त्यावर सध्या बोलणार नाही, असेही सुरेश धस यांनी म्हटले आहे.

### शेतकऱ्याला चाकूचा...

चव्हाण आणि सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक परशुराम मंजुळे यांनी घटनास्थळी धाव घेतली. तपासासाठी श्वान पथक आणि ठसे तज्ज्ञांना पाचारण करण्यात आले. या प्रकरणी मोहन शंकर शेकडे यांच्या फिर्यादीवरून चार अज्ञात चोरट्यांविरोधात कलम ३०९(४), ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात

पान ४ वरून

आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कृष्णा चव्हाण करत आहेत. या घटनेनंतर गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रात्रीच्या वेळी घरफोड्या आणि दरोड्यांच्या घटनांमध्ये वाढ होत असून, पोलिसांनी गस्त वाढवावी अशी मागणी स्थानिकांनी केली आहे.

### निववडणूकांपूर्वीच...

जबाबदारी पार पाडावी लागेल. या नव्या नियमावलीमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अगोदरच स्थानिक पातळीवरील कार्यकर्त्यांना नवी संधी मिळणार आहे. महाराष्ट्रात आता प्रत्येक पाचशे मतदारांमागे विशेष कार्यकारी अधिकारी राहणार आहे. त्यामुळे राज्यात १ लाख ९४ हजार विशेष कार्यकारी अधिकारी नियुक्त होणार असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे. विशेष कार्यकारी अधिकारी हे शोभेचं पद नसणार आहे, तर त्यांना १३ ते १४ विशेष अधिकार देण्यात येणार असल्याची माहितीही बावनकुळे यांनी दिली. आतापर्यंत प्रत्येक १००० मतदारांमागे एक विशेष कार्यकारी अधिकारी असायचा. मात्र, आता राज्य सरकारने नव जीआर काढून प्रत्येक ५०० मतदारांमागे एक विशेष कार्यकारी अधिकारी नेमण्याचा निर्णय घेतल्याने मोठ्या संख्येने विशेष कार्यकारी अधिकारी राज्यात नेमले जाणार आहे. त्यामुळे, राजकीय कार्यकर्त्यांसाठी खासकरून सत्ताधारी पक्षाच्या कार्यकर्त्यांसाठी नवी संधी चालून आली आहे. त्यातच, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वीच कार्यकर्त्यांना ही संधी मिळणार आहे. दरम्यान, विशेष म्हणजे आजच्या जीआरमुळे आतापर्यंत पदावर असलेल्या विशेष कार्यकारी अधिकारीचे पद तात्काळ प्रभावाने नाहीसे होणार आहे. लवकरच प्रत्येक जिल्ह्यातल्या निवड समितीच्या माध्यमातून नव्या विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांची निवड व नेमणूक केली जाणार असल्याची माहितीही बावनकुळे यांनी दिली. ❊ निकष काय? : संबंधित व्यक्तीचे वय विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्त करावयाच्या कॅलेंडर वर्षाच्या १ जानेवारी २०२५ रोजी २५ वर्षांपेक्षा कमी नसावे व ६५ वर्षांपेक्षा अधिक नसावे. संबंधित व्यक्ती किमान दहावी (एस.एस.सी.) किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असावी, आदिवासी व दुर्गम भागाकरीता किमान आठवी परीक्षा उत्तीर्ण असावी. संबंधित व्यक्तीचे महाराष्ट्रातील सलग वास्तव्य, त्यांची विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करावयाच्या कॅलेंडर वर्षाच्या १ जानेवारीच्या लगतपूर्वी किमान १५ वर्षे असावे. संबंधित व्यक्तीला फौजदारी गुन्ह्याखाली शिक्षा झालेली नसावी किंवा त्याच्याविरुध्द गंभीर स्वरुपाचा गुन्हा नोंदविलेला नसावा किंवा कोणत्याही न्यायालयाने त्यास नादार (लरपर्ज्ञींीं) जाहीर केलेले नसावे. कोणतीही व्यक्ती विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून पुनर्नियुक्तीस पात्र असेल, मात्र निकषांच्या पूर्ततेसाठी त्याची पुनर्पडताळणी होणे आवश्यक राहील. गट-अ व गट-ब (राजपत्रित) निवृत्त शासकीय अधिकारी हे विशेष कार्यकारी अधिकारी नियुक्तीस पात्र असतील. ❊ विशेष कार्यकारी अधिकारी पदाचे अधिकार काय? : ❊ राज्यात प्रत्येक ५०० मतदारांना मागे एक याप्रमाणे नवे १ लाख ९४ हजार विशेष कार्यकारी अधिकारी नेमले जातील.❊ अनेक महत्त्वाच्या विषयांमध्ये, विकासाच्या विषयांमध्ये, दक्षता समितीमध्ये विशेष कार्यकारी अधिकारी काम करणार आहे. ❊ विशेष कार्यकारी अधिकारी शासनाच्या विविध योजनांमध्ये सहकारी म्हणून काम करणार आहे. ❊ प्रशासन आणि पोलिसांशी समन्वय साधणार आहे. ❊ विशेष कार्यकारी अधिकारी होण्यासाठी किमान दहावी उत्तीर्ण असावे लागेल... ❊ वय २५ वर्षांपेक्षा जास्त आणि ६५ पेक्षा कमी असावे. ❊ ज्या तरुणांना, नागरिकांना सामाजिक कामांमध्ये रस आहे, त्या तरुणांना नागरिकांना या मध्ये संधी मिळणार. ❊ महसूल मंत्री राज्याच्या निवड समितीचे अध्यक्ष राहणार आहे. ❊ विशेष कार्यकारी अधिकारी

पान ४ वरून

निवडण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात महसूल मंत्र्यांचे अध्यक्ष पालकमंत्री आणि जिल्हाधिकाऱ्यांची समिती राहील. ❊ शासनाचा नवीन जीआर आल्यानंतर आताचे विशेष कार्यकारी अधिकार आहे त्यांचे पद रद्द होऊन नव्याने नियुक्त्या केल्या जातील. ❊ शासकीय योजनांसाठी ज्या काही प्रमाणपत्र लागतात ते प्रमाणपत्र देण्याचा अधिकार या विशेष कार्यकारी अधिकारी असणार. ❊ विविध समित्यांमध्ये त्यांना स्थान मिळेल.. सरकारच्या विविध कामांवर लक्ष घालण्याचे अधिकार त्यांना असेल. ❊ विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून केलेली नियुक्ती जिल्हाधिकारी यांनी काढलेल्या नियुक्तीच्या आदेशापासून ५ वर्षांसाठी असेल.

### जरांगेचा मुंडे-कराडबाबत...

गौप्यस्फोट केला. ते म्हणाले, मला भेटण्यासाठी धनंजय मुंडे (उहरपरपक्षर् चींपवश) येणार अशी चर्चा होती. तसा निरोपही गावात सात ते आठ दिवस आधी येत होता. या किंवा नका येऊ असा विषय लगातार सुरुच होता. नक्की वेळ नाही सांगता येणार आहे, कारण त्यावेळचं वातावरण भयानक होतं. पण रात्री दोन एक वाजता ते भेटायला आहे. मी झोपलेलो होतो. परत ते भेटल्याशिवाय जाणारच नाही., असा निरोप आला. मला वाटलं झोपलेलो म्हटल्यावर, ते गेले असतील.मग पुन्हा उठलो. आणि डोळे चोळतच खाली गेलो. ते आले, पण आम्ही त्यांना भेटायचं नाही ठरवलं.पण ते बाहेर थांबलेले होते.ते खूप वेळ थांबले.मग मीच म्हटलं कितीवेळ उभं करावं.कारण मला हृदय आहे,माणुसकी आहे.म्हणून मग त्यांना भेटायला गेलो.त्यावेळी धनंजय मुंडेंनीच वाल्मिक कराडची ओळख करुन दिली. जरांगे म्हणाले, शेवटी त्यांचं नाव आहे, आणि आपण असा दुजाभाव नाही केला पाहिजे असं मला वाटलं. त्यामुळे तसाच कणाकणा खाली गेलो. भेटलो. तर दारात दोन लोकं उभी होती. एक धनंजय मुंडे आणि दुसरे ते कराड. धनंजय मुंडे यांनीच मला कराडची ओळख करुन दिली होती. त्यावेळी आपण त्यांना हेच का तो हर्व्हेस्टरचे पैसे बुडवणारा असं बोलल्याचंही जरांगेंनी यावेळी सांगितलं. ते आले, पण आम्ही त्यांना भेटायचं नाही ठरवलं. पण ते बाहेर थांबलेले होते. ते खूप वेळ थांबले. मग मीच म्हटलं कितीवेळ उभं करावं. कारण मला हृदय आहे,माणुसकी आहे. म्हणून मग त्यांना भेटायला गेलो. त्यावेळी धनंजय मुंडेंनीच वाल्मिक कराडची ओळख करुन दिली. धनंजय मुंडे या भेटीवेळी आपल्याला म्हणाले, माझ्यावर अन्याय झाला, त्यावेळी मराठा समाजानंच मला मोठं केलं. माझ्याकडे लक्ष राहु द्या, असंही म्हटल्याचं जरांगेंनी यावेळी सांगितलं. तसेच त्यावेळी ते जाताना आपल्या पायाही पडले,असा खळबळजनक दावाही त्यांनी केला. अंतरवाली सराटीत मला भेटण्यासाठी निवडणुकीच्या काळात शेकडो राजकीय नेते यायचे.मी पण त्यांना दिवस-रात्र भेटत होतो.मीही त्यांचा सन्मान केला. त्यांच्यासोबत अजिबातच दुजाभाव केला नाही. राज्यभरातले नेते माझ्याकडे येणार,आणि मग मी त्यांची उगीचच हेळसांड करायची. कारण मी गरीबाचं लेकरू आहे. काम करणारा माणूस आहे.पण एखादा मोठा व्यक्ती माझ्याकडे आला आहे. मी त्यांची हेळसांड करणं,हे मला शोभत नव्हतं.गरीबाच्या घरात मी वाढलेलो आहे. दिवसरात्र मी सगळ्यांना भेटत होतो, असंही जरांगेंनी यावेळी सांगितलं. त्यादिवशीही नाही आणि आजही नामदेव शास्त्रींना मी दोषच दिलेला नाही. कारण ती टोळी विचित्र आहे. ती करवून घेत आहे. केलेलं पाप झाकण्यासाठी देव-धर्म काही कळत नाही. तर ती टोळी विचित्र आहे. केलंय पाप आपण,पण ते झाकायचं कसं,पण ते आता झाकतच नसतं. लोकं लई वाईट परिस्थितीतून गेले आहेत. फक्त ओबीसी या नावाखाली त्यांनी खूप अन्याय सहन केला आहे. फक्त तेवढ्या नावाखाली अन्याय सहन केला. काही गरज नव्हती,त्या टोळीचा अन्याय सहन करायचा पणतरी त्यांनी केला.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

### च-हाटा रोडवरील पालवण फाटा रेल्वेपुल प्रकरणात कारवाईसाठी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, रेल्वे सुरक्षा आयुक्त मनोज अरोरा यांना तक्रार

# रेल्वे आयुक्तांच्या दौऱ्यात रेल्वे पुलावरच आंदोलन : डॉ. ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

अहिल्यानगर -बीड- रेल्वे मार्गावरील बीड तालुक्यातील च-हाटा रोडवरील पालवण फाटा येथील २ कोटी ७० लाख रुपये खर्चून बांधण्यात आलेला पुल लोहमार्गाची व पुलाची दिशा यांचा अंदाज चुकल्याने निरुपयोगी ठरला असुन मध्यंतरी पाडण्याचे काम सुरू होते. संबंधित प्रकरणात सखोल चौकशी करून जनतेच्या पैशाचा अपव्यय करणा-या संबंधित



रेल्वे विभागाचे अभियंता आणि लोहमार्ग पुलाचे काम करणारी ठेकेदार कंपनी यांच्यावर प्रशासकीय कारवाई करून नुकसान भरपाईची रक्कम शासन तिजोरीत जमा करण्यात यावी



या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर , शेख युनुस, बीड जिल्हाध्यक्ष (इंटक)रामधन जमाले,शिवशर्मा शेलार, शेख मुबीन, शेख मुस्ताक, पांडुरंग हराळे यांनी निवासी जिल्हाधिकारी बीड शिवकुमार स्वामी यांच्या मार्फत केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, रेल्वे सुरक्षा आयुक्त मनोज अरोरा यांना लेखी निवेदन देऊन दि.०५ बुधवार रोजी रेल्वे पुलावरच धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा दिला आहे.

अहिल्यानगर - बीड -परळी रेल्वे मार्गावरील बीड तालुक्यातील च-हाटा रोडवरील पालवण फाटा येथील २ कोटी ७० लाख रुपये खर्चून बांधण्यात आलेला पुल लोहमार्गाची व पुलाची दिशा यांचा अंदाज चुकल्याने पाडण्यात येत होता.

**दि.०५.०२.२०२५ वार बुधवार रोजी राजुरी ते बीड या नविन रेल्वे लोहमार्गाची जलदगती चाचणी घेण्यात येणार आहे. रेल्वे सुरक्षा आयुक्त मनोज अरोरा रेल्वे प्रवाशांची सुरक्षा व सुविधांसाठी आवश्यक उपाययोजना या दृष्टीने राजुरी ते बीड रेल्वे स्थानका दरम्यानची तपासणी करणार असुन त्याच दिवशी दि.५ बुधवार रोजी च-हाटा रोडवरील पालवण फाटा येथील रेल्वे पुलावर धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन रेल्वे सुरक्षा आयुक्त यांना जिल्हाधिकारी बीड, पोलिस अधीक्षक बीड यांच्या मार्फत देण्यात आले आहे.**

---

# डिजिटल साक्षरता ही युवकांसाठी काळाची गरज

## मौजे पोखरी मैदा ता. जि. बीड येथे आदर्श कॉलेज पिंपळनेरच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे उद्घाटन

**बीड । प्रतिनिधी**

प्रत्येक स्वयंसेवकाने स्वतः च्या विकासासोबत आपल्या मित्र परिवाराला सोबत घेऊन आपल्या गावातील परिसरातील युवकांना या नवयुगामध्ये साक्षर म्हणजे फक्त आणि फक्त पारंपारिक शिक्षण घेतले म्हणजे साक्षर नव्हे, त्यासाठी डिजिटल साक्षरता ही काळाची गरज आहे प्रत्येकाने सोशल मीडियाच्या माध्यमातून, प्रिंट मीडियाच्या माध्यमातून, डिजिटल भारत या प्रोग्रॅम नुसार ज्ञान, डिजिटल ज्ञान अवगत करणे खूप आवश्यक झाले आहे असे मत स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयाचे समाजशास्त्र



विभाग प्रमुख, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर, समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे माजी सदस्य प्राध्यापक डॉक्टर तात्याराम सोंडगे यांनी मांडले.

---

# गॅलेक्सी इंग्लीश स्कूल सादोळा येथे पालक मेळावा संपन्न

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील गॅलेक्सी इंग्लीश स्कूल सादोळा या ठिकाणी पालक मेळावा संपन्न झाला.आणि तृतीय चाचणी परीक्षेचा निकाल आयोजित करण्यात आला होता त्यावेळी सन्म ाननीय पालक वर्ग उपस्थीत होता. चेअरमन डॉ .विठ्ठलराव एरंडे व .शाळेचे प्राचार्य अँथोनी सर पालक



वर्ग यांना सविस्तर माहिती दिली, प्रत्येक विद्यार्थी आमचा मुलगा आहे त्यांच्या सुप्त गुणांना वाव देऊ व गुणवत्ता पूर्ण विकास करू असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन युवराज राऊत सर यांनी केले व आभार प्रदर्शन सुरज सोळंके सर यांनी केले.



*हिंदुस्तान पेट्रोलियम कंपनीचे रिजनल मॅनेजर अमित कलंगुटकर व एरियल मॅनेजर प्रथमेश सोलापूरे यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयास भेट दिली असता त्यांचा सन्मान करताना कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे उपसभापती श्रीहरी मोरे, संचालक अमोल जाधव, नंदकिशोर सजगणे, लोणार अर्बनचे चेअरमन प्रवीण देशमुख, बाजार समितीचे सहा. सचिव रवींद्र नाईकनवरे.*

---

# घाटसावळी, नाळवंडी, शिवणी, नाथापुर सबस्टेशनमधून कमी दाबाने वीजपुरवठा, शेतकरी प्रचंड त्रस्त : धनंजय गुंदेकर

**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील २२० केव्ही बीड उपकेंद्रातून निघणारी ३३ केव्ही वीज वाहिनी सध्या प्रचंड ओव्हरलोड झाली आहे. सदर ३३ केव्ही लाईनवर मोठ्या प्रमाणात भार असून, पाच सबस्टेशन्स (३३/११ केव्ही शिवणी, नाळवंडी, घाटसावळी, खडकी देवळा, नाथापूर) आणि ६ औद्योगिक कंपन्या जोडलेल्या आहेत. त्यामुळे या लाईनवर अत्याधिक ताण येऊन वारंवार ट्रिपिंग, कमी दाबाचा (लो व्होल्टेज) वीजपुरवठा तसेच अनियमितता यांसारख्या गंभीर



समस्या निर्माण झाल्या असल्याचे संचालक धनंजय गुंदेकर यांनी म्हंटले आहे. याबाबत कुणीही आवाज उठवत नसल्याने महावितरण कडून दुर्लक्ष होत असून आठवडाभर झाले शेतकरी, नागरिक यांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. शेती पंपांना योग्य दाबाने वीज मिळत नसल्यामुळे सिंचनावर विपरीत परिणाम होत आहे. पिके कोमेजून जात असून घरगुती वीज वापर देखील प्रभावित झालेला आहे. याच भागात विद्युत पुरवठा बाबत सातत्याने अन्याय होतो, या सब स्टेशन मधील समस्यांसाठी कोणताच लोकप्रतिनिधी पुढे येत नसल्याने .

---

# उकिर्डा चकला येथे त्रिदिनी सप्ताह साजरा

**शिरूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील उकिर्डा चकला गणेशजयंती निमित्त त्रिदिनी सप्ताहाचे आयोजन दरवर्षी वर्ष दुसरे प्रमाणे ह भ प महंत हनुमंत महाराज शास्त्री श्री क्षेत्र सालसिद्ध बाबा संस्थान मिडसांगवी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजन करण्यात आले होते यामध्ये तीन दिवस गणेश पुराण काकडा भजन हरिपाठ हरीकीर्तन व हरिजागर करण्यात आला . ह भ प संतोष गुरु शुक्ल भारती महाराज व अतुल महाराज शास्त्री यांचे कीर्तन पार पडले. यावेळी काल्याचे किर्तन ह भ प हनुमंत महाराज शास्त्री यांनी केले तसेच या सप्ताह भगवान गडाची महंत नामदेव महाराज शास्त्री हेही उपस्थित होते. यावेळी महाप्रसादाचा आयोजन रावसाहेब आबाजी धामणे यांनी केले होते. मंडप व्यवस्थापन इंजिनियर रमेश पानसंबळ पाणी व्यवस्थापन सुमंत



खेडकर गायनाचार्य संगीत विशारद अजिनाथ महाराज पानसंबळ मृदंगाचार्य मृदुंग विशारद सचिन महाराज खेडकर रंगीत संगीत हरिपाठ मिडसांगवी संस्थान विद्यार्थी वृंद यांनी केले तर टाळकरी समस्त उकिरडा चकला ग्रामस्थ व पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी केले.

---

# ग्रामीण रुग्णालय माजलगाव येथे धान्य वाटपाचा कार्यक्रम

**बीड । प्रतिनिधी**

क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम जिल्हा रुग्णालय बीड व ग्रामीण रुग्णालय माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने उपचार घेत असलेल्या क्षय रुग्णांना मोफत अन्न धान्य किटचे वाटप करण्यात आले. या वेळी एकूण अकरा लाभार्थ्यांना धन्य किटचे ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने वाटप करण्यात आले. यावेळी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.विजय



कट्टे, डॉ. बडे, डॉ. दबडगावकर डॉ. काळे, डॉ. रुद्रवार डॉ. मिनाक्षी साळुंखे, डॉ. शेजुळ, डॉ. वाघमारे यावेळी तालुका क्षयरोग सुपरवायजर अर्शद शेजुळ हे उपस्थित होते. यावेळी सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

---

## निधन वार्ता



**बीड । प्रतिनिधी**

ॲड.सदानंद वाघमारे' यांचे वडील महादेव गिनाजी वाघमारे यांचे दिनांक ०२/०२/२०२५ राहत्या घरी सायंकाळी ०६.०५ वाजता दुःखद निधन झाले असून त्यांचा अंत्यविधी उद्या सोमवार दिनांक ०३/०२/२०२५ सकाळी ०९.३० वाजता भगवान बाबा प्रतिष्ठान बीड येथील स्मशानभूमी येथे झाले. दैनिक मराठवाडा पत्र परिवार सहभागी आहे.

---

# दिव्यम वसंत टाकणखार याने देशपातळीवरील अबॅकस स्पर्धेत सुपर स्टार परितोषिक पटकावल

**माजलगाव । प्रतिनिधी**

विभागीय क्रिडा संकुल छत्रपती संभाजी नगर येथे शनिवार दिनांक ०१ फेब्रुवारी रोजी घेण्यात आलेल्या देशपातळीवरील अबॅकस स्पर्धेमध्ये माजलगाव येथील नेहा काळे अबॅकस क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादक केले असुन या स्पर्धेमध्ये देशभरातून हजारो विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. स्पर्धा ही ऑनलाईन व ऑफलाइन या दोन्ही पद्धतीने घेण्यात आली होती , सात मि निटांमध्ये १०० गणिते सोडवण्याचे कौशल्य विद्यार्थ्यांनी पूर्ण केले. ही स्पर्धा ऋउहरा अबॅकस या संस्थेमार्फत घेण्यात आली होती



विभागीय क्रीडा संकुल छत्रपती संभाजी नगर या ठिकाणी संस्थेचे कार्यकारी संचालक श्री योगेश देशम ाने व सौ.आरती देशमाने यांनी स्पर्धा आयोजित केली होती. अतिशय उत्साहामध्ये ही स्पर्धा पार पडली असता या स्पर्धेमध्ये माजलगाव येथील नेहा काळे अबॅकस अॅकॅडमीचे विद्यार्थी चि. दिव्यम वसंत टाकणखार हा देशातून प्रथम सुपरस्टार झाला. तसेच अबॅकस क्लासेसच्या संचालिका सौ.नेहा प्रमोद काळे यांना सलग चौथ्या वर्षी बेस्ट टीचर अवॉर्ड व बेस्ट कन्सिस्टन्सी फ्रेंचाईजी अवॉर्डने देखील सन्मानित करण्यात आले.

---

# ब्राह्मण महिला मंचाच्या वतीने शानदार राज्यस्तरीय सन्मान सोहळा उत्साहात

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

मातृशक्ती हीच आमची भारताची मुळशक्ती असुन आज सर्व क्षेत्रात यशस्वीनींनी यशोशिखर गाठले आहे.महिला सबलीकरणाचा प्रामाणिक प्रयत्न हा स्वतःपासून करावा लागेल तरच स्त्री पुरुष समानता खऱ्या अर्थाने स्थापित होईल असे प्रतिपादन परळीचे माजी नगराध्यक्ष तथा अमृत संस्थेचे सल्लागार बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी केले.ब्राह्मण महिला मंचाच्या वतीने शानदार राज्यस्तरीय सन्मान सोहळा उत्साहात पार पडला.या सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते



शंभर कर्तृत्ववान महिलांचा विशेष पुरस्काराने गौरव करण्यात आला.

ब्राह्मण महिला मंच, घे भरारी फेसबुक ग्रुप व यशस्वी उद्योजिका समूह यांच्या संयुक्त विद्यमानाने राज्यस्तरीय सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.या सोहळ्यात विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांना शाल,स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र अशा स्वरूपात राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

---

## कचरु नागरगोजे यांचे अल्पशा आजाराने दु:ख निधन

**आष्टी । प्रतिनिधी**



तालुक्यातील कऱ्हेवडगांव येथील कचरु साहेबराव नागरगोजे वय ७० वर्षे यांचे दि.२ फेब्रुवारी रोजी मध्यरात्री १ वाजता अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. मागिल ६ महिन्यांपासून आजारी होते.दि.२ जानेवारी रोजी मध्यरात्री १.०० च्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली.त्यांच्या पार्थिवावर सकाळी ९ वाजता शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी दिलीप शेठ बाफना, मा.जि.प.सदस्य सतिश शिंदे, सामाजिक कार्यकर्ते राम खाडे, मा.सभापती आत्माराम फुंदे, आकाश बाफना,सरपंच परिवंत गायकवाड, मा.सरपंच जालिंदर गायकवाड, भगवानराव सांगळे,मा. सरपंच केशव बांगर, मा.सरपंच जालिंदर नागरगोजे, उपसरपंच बाळासाहेब नागरगोजे, अंबादास नागरगोजे, सोमीनाथ विधाते मुकादम, आत्माराम नागरगोजे, पत्रकार संतोष नागरगोजे,अक्षय विधाते यांच्या सह शैक्षणिक, धार्मिक , सामाजिक यासह विविध क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्योजक लहु नागरगोजे व राम नागरगोजे यांचे ते वडील होते.

---


## जाहीर प्रगटन

### मा. श्री. ए. एम. फडतरे, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १६३ / २०२५ ॲड. शेळके वाय. आर.**

१) विठ्ठल पि. वंसत वाघुंबरे, वय ५२ वर्षे, धंदा-नौकरी, रा. क्रांती नगर, नगर रोड, बीड ता. जि. बीड २) राम पि. वसंतराव वाघुंबरे, वय ५० वर्षे, धंदा-नौकरी, रा. मंत्री गल्ली, सुभाष रोड, बीड ता. जि. बीड ३) पल्लवी भ्र. आनंद वाघुंबरे, वय-३६ वर्षे, धंदा-घरकाम, रा. मंत्री गल्ली, सुभाष रोड, बीड ता. जि. बीड ४) श्रध्दा आनंद वाघुंबरे, वय- १८ वर्षे, धंदा-शिक्षण, रा. मंत्री गल्ली, सुभाष रोड, बीड ता. जि. बीड (५) कृष्णा आनंद वाघुंबरे अ.पा.क आई अर्जदार क्र ३, रा. मंत्री गल्ली, सुभाष रोड, बीड ता. जि. बीड

विरुध्द गैरअर्जदार :- निरंक

अर्जदार हे भारतीय आहेत

**प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नामे वसंत पि. गंगाराम वाघुंबरे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नामे **वसंत पि. गंगाराम वाघुंबरे, रा. मंत्री गल्ली, सुभाष रोड, बीड ता. जि. बीड हे दिनांक** २०/०६/२०२४ **रोजी मंत्री गल्ली, सुभाष रोड, बीड ता. जि. बीड** येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्र. १ व २ हे मयताचे मुले आहेत. अर्जदार क. ३ ही मयताच्या मयत मुलाची पत्नी म्हणजेच मयताची सुन असुन अर्जदार क. ४ व ५ हे मयताचे नात नातु आहेत. अर्जदार क्र. ५ हा अज्ञान असुन त्याची अ. पा. क. आई अर्जदार क्र. ३ ही आहे. मयताचे आई वडील यापुर्वीच मयत झालेले आहेत. अर्जदार यांच्याशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय कामासाठी, कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. **पुढील दिनांक** ०४/०३/२०२५

आज दिनांक ०१ /०२/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) अधीक्षक दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

(स्वाक्षरीत) क.लिपीक

शिक्का


---

# रायगड जिल्हा परिषदेच्या विद्यार्थ्यांची राज्यबाहेर अविष्कार भरारी राष्ट्रीय अविष्कार अभियानातून केली मध्यप्रदेश भोपाळ येथे भेट

**रायगड । प्रतिनिधी**

प्रादेशिक विज्ञान भवन,भोपाळ येथे दि.२२ ते २५ जानेवारी,२०२५ दरम्यान करण्यात आले होते.या सहलीसाठी रायगड जिल्हा परिषदेच्या ६ शाळांची निवड करण्यात आली होती ज्यात मुख्यमंत्री माझी शाळा,सुंदर शाळा उपक्रमात जिल्ह्यात प्रथम व विभागात द्वितीय पुरस्कार प्राप्त रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा,वडगाव खालापूर चे ८ विद्यार्थी, परिषद उच्च प्राथमिक शाळा तळोदे पाचनंद पनवेल चे ४ विद्यार्थी, रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा,खारपडा पेण चे ६ विद्यार्थी,रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा,खोपटे उरण चे ८ विद्यार्थी,विर हुतात्मा भाई कोतवाल विद्यामंदिर गिरीस्थान माथेरान कर्जत चे १३ विद्यार्थी, व शासकीय आश्रम शाळा पिंगळस,कर्जत चे ६ विद्यार्थी शाळेतील एकूण ४५ विद्यार्थी व श्री.सुभाष राठोड मुख्याध्यापक





शाळा वडगाव खालापूर यांची या सहलीसाठी नोडल अधिकारी म्हणून तर श्रीम.सुषमा धुर्वे पेण यांची व्यवस्थापक म्हणून नियुक्ती जिल्हा परिषदेकडून करण्यात आली होती.सोबत श्री.संतोष चाटसे, माथेरान,सौ.नंदिनी कदम शाळा खारपाडा,श्रीम. विभावरी सिंगासने शाळा तळोदे पाचनंद,श्रीम.अमृता तोडकर शाळा,खोपटे सौ.सिमा डोंगरे अधीक्षक शासकीय आश्रम शाळा,पिंगळस यांची या सहलीसाठी निवड करण्यात आली होती.

श्री. सुभाष राठोड,शाळा वडगाव यांची या सहलीसाठी जिल्हा नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. प्रेक्षणीय स्थळे व पर्यटनाचा आनंद मुलांनी लुटला.या कार्यक्रमाच्या प्रमुख मा.पुनीता गुरव शिक्षणाधिकारी प्राथमिक,रायगड जिल्हा परिषद यांनी मुलांना प्रवासादरम्यान व सहलीदारम्यान सतत संपर्कात राहून व्हिडिओ कॉल वरून नियमित सहल यशस्वीपणे पार पाडण्यासाठी मार्गदर्शन केले. तसेच मा.मुख्यकार्यकारी अधिकारी डॉ.भरत बास्टेवाड साहेब यांनी सुद्धा व्हिडीओ कॉल करून विद्यार्थ्यांशी संवाद साधत सहलीबाबत जाणून घेतले.

दैनिक

छ.संभाजीनगर, बीड, जालना, नांदेड, परभणी, धाराशिव, लातूर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

मंगळवार, दि. ४ फेब्रुवारी २०२५ पान - ४

# खा.सोनवणेंनी काढले रेल्वे मार्गातील प्रलंबित 'गतिरोधक' अन् रेल्वेने धरली 'स्पीड'





## आज व उद्या बीडपर्यंत जलदगती चाचणी

**बीड । प्रतिनिधी**

सन १९९५ ला अहिल्यानंतर-परळी रेल्वे मार्गाला मंजुरी मिळाली. काम सुरु झाले मात्र त्या कामासाठी म्हणावा तसा पाठपुरावा न झाल्याने काम रखडत गेले. २८/२९ वर्षात रेल्वेचे काम अंमळनेर पर्यंतच येऊन थांबले होते. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत विजयी झाल्यानंतर खा.बजरंग सोनवणे यांनी पहिलीच बैठक रेल्वे विभागाची घेतली. कामास गती देण्यासाठी येत असलेल्या अडथळ्यांची माहिती घेतली. कामास गती देण्यासाठी रेल्वेमंत्री व रेल बोर्डाचे चेअरमन यांची वारंवार भेट घेऊन रेल्वे कामाला गती देण्याचे काम केले. पालवन परिसरात जमीनीच्या मावेजाची थकित राहिलेली प्रकरणे मार्गी लावत रेल्वे कामाला गती दिली. आता दि.४ व ५ फेब्रुवारी रोजी नवगण राजुरी ते बीड लोहमार्गावर ▶▶पान २ वर

### नागरिकांनी रेल्वे मार्गापासून दूर रहावे-खा.सोनवणे

दि.४ व ५ रोजी सकाळी १० ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत आहिल्यानगर-बीड-परळी रेल्वेच्या कामातील विघनवाडी (ता.शिरुर) ते नवगण राजुरी (ता.बीड) व नवगण राजुरी ते बीड या पूर्ण झालेल्या लोहमार्गावर निरीक्षण व जलदगती चाचणी होणार आहे. त्यामुळे या परिसरातील नागरिकांनी रेल्वे मार्गापासून दूर रहावे, गुरे व पाळीव प्राणी रुळावर येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

# गावकारभाऱ्यांना जिल्हाधिकाऱ्यांचा दणका



## जात वैधता प्रमाणपत्र न दिल्याने २४ सरपंच,८२० सदस्य पदावरून अपात्र

**बीड । प्रतिनिधी**

बीड, (प्रतिनिधी):- जिल्ह्यात जात वैधता प्रमाणपत्र वेळेत सादर न केल्याने मोठी कारवाई करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी जानेवारी महिन्यात दोन टप्प्यांत मिळून ८४४ सदस्य आणि सरपंचांचे सदस्यत्व रद्द केले आहे. २० जानेवारी रोजी झालेल्या पहिल्या कारवाईत १३ सरपंच आणि ४१८ सदस्य, तर ३१ जानेवारी रोजी दुसऱ्या टप्प्यात ११ सरपंच आणि ४०२ सदस्य अपात्र ठरले. या कारवाईमुळे गावपातळीवरील नेतृत्वाला मोठा फटका बसला आहे. ग्रामपंचायतीतील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागास प्रवर्गातील आरक्षित जागांसाठी निवडून आलेल्या सदस्यांना निवड झाल्यानंतर १२ महिन्यांच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असते. मात्र, २०२० ते २०२५ या कालावधीत झालेल्या निवडणुकीतील अनेक सरपंच व सदस्यांनी ही कागदपत्रे सादर केली नाहीत. त्यामुळे नियमांचे उल्लंघन झाल्याने ▶▶पान २ वर

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बीडमध्ये



## ६५ हजार लोकं येणार-आ.सुरेश धस

**बीड । प्रतिनिधी**

अहिल्यानगर, (प्रतिनिधी) :-बीडमधील सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरण व खंडणीप्रकरणातील आरोपी वाल्मिक कराडमुळे सध्या बीड जिल्हा राज्याच्या केंद्रस्थानी आहे. त्यातच, महायुतीमधील भाजप आमदार सुरेश धस यांनी वाल्मिक कराड व मंत्री धनंजय मुंडेंविरुद्ध आरोपींचे गौप्यस्फोट करत राजकीय धुरळा उडवून दिला आहे. त्यामुळे, मंत्री धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. एकीकडे धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी होत असतानाच दुसरीकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बीड दौऱ्यावर जात आहेत. मुख्यमंत्री झाल्यानंतर पहिल्यांदाच ते बीड दौऱ्यावर असून आमदार सुरेश धस यांनी त्यांच्या कार्यक्रमाबाबतची माहिती दिली. तसेच, या बैठकीला बीड जिल्ह्यातील दोन्ही मंत्री उपस्थित राहणार का, या प्रश्नावर त्यांनी थेट उत्तर देणं टाळलं, तर मुंडे बंधु-भगिनींबाबत मोठं वक्तव्य केलं. देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री झाल्यावर पहिल्यांदाच बीड जिल्ह्यात जनतेतील कार्यक्रमाला येत आहेत. खुंटेफळ धरणाच्या बोगद्याच्या प्रकल्पाच्या कामाच्या शुभारंभासाठी ते येणार असून १.६८ टीएमसी पाणी येथील शेतकऱ्यांना मिळणार आहे. सन २००५-०६ पासून ही योजना माझ्या डोक्यात होती. या प्रकल्पामुळे आष्टी तालुक्यातील जवळपास २७ हजार ५०० हेक्टर जमीन ओलिताखाली येणार आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांचे जिल्ह्यात जोरदार स्वागत करणार असून ६५ हजार लोक या कार्यक्रमाला येणार आहेत, अशी माहिती आमदार धस यांनी दिली. मात्र, जिल्ह्यातील दोन मंत्री मुंडे बंधु-भगिनींबाबतच्या वक्तव्यावर त्यांनी मोठं वक्तव्य केलं. ▶▶पान २ वर

### शेतकऱ्याला चाकूच्या धाक दाखवून

# दीड लाखांची रोकड लंपास

**कडा । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील महिंदा गावातील शेकडे वस्तीवर रविवारी पहाटे चार चोरट्यांनी घरात शिरून शेतकऱ्याच्या गळ्याला चाकू लावून दीड लाख रुपयांची रोकड लुटली. ही घटना पहाटे २ वाजताच्या सुमारास घडली असून, अंमळनेर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिंदा येथील शेतकरी मोहन शेकडे हे आपल्या कुटुंबासह शेकडे वस्तीवर राहतात. शनिवारी रात्री जेवण करून सर्व जण झोपले होते. मात्र, पहाटे २ वाजता घराची कडी तोडून चार चोरट्यांनी घरात प्रवेश केला. आवाजाने शेकडे यांना जाग आली असता चोरट्यांनी त्यांच्या गळ्याला चाकू लावत धमकावले. तसेच आरडाओरड करू नये म्हणून त्यांचे तोंड दाबून धरले. याच दरम्यान चोरट्यांनी घरभर शोधाशोध सुरू केली आणि पत्र्याची पेटी ताब्यात घेतली. त्याचवेळी एका चोराने घरातील वयोवृद्ध महिलेच्या गळ्यातील सोन्याची वस्तू तोडली, मात्र शेकडे कुटुंबाने जोरात आरडाओरड केली असता घाबरलेल्या चोरट्यांनी ते सोडून दिले आणि घरातील पेटी घेऊन पळ काढला. शेजाऱ्यांनी आवाज ऐकून पाठलाग केला, परंतु अंधाराचा फायदा घेत चोरटे पसार झाले. काही अंतरावर पेटी आढळली, मात्र त्यातील दीड लाख रुपयांची रोकड चोरट्यांनी लंपास केली. ही रक्कम शेती आणि शेळी-म्हैस विक्रीतून मिळाली होती. या घटनेची माहिती मिळताच आष्टीचे उपविभागीय पोलीस अधिकारी बाळकृष्ण हानपुडे, अंमळनेर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भार्गव सपकाळ, पोलीस उपनिरीक्षक कृष्णा ▶▶पान २ वर

## कृष्णा आंधळे करून करून काय करणार?

# पुरावे तर विष्णू चाटे अन् 'आका'ने नष्ट केलेत-सुरेश धसांचा नवा बॉम्ब



**बीड । प्रतिनिधी**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख जे बोलत आहेत, ते चुकीचे नाही. पण, कृष्णा आंधळे करून करून काय करणार आहे. तो काय पुरावे नष्ट करतोय. पुरावे नष्ट करण्याचे पाप विष्णू चाटे आणि 'आका'ने केलेले आहे. विष्णू चाटे याने दहा तारखेनंतरचे त्याचं आणि 'आका'सोबतचं असणारं बोलणं, हे सीआयडीसमोर येऊ नये, असा प्रयत्न केला आहे. मात्र, तो त्यांचा प्रयत्न यशस्वी होणार नाही. कारण, पोलिस संबंधित कंपनीकडून त्यांच्यात काय संवाद झाला, हे मिळवू शकतात. त्याने मोबाईल बंद करून पाण्यात टाकला असावा. तो लवकरात लवकर सापडेल, असेही आमदार सुरेश धस ▶▶पान २ वर

# निवडणुकांपूर्वीच स्थानिक कार्यकर्त्यांना संधी

## राज्यात १ लाख ९४ हजार एसईओची नियुक्ती



**मुंबई । वृत्तसेवा**

महाराष्ट्र सरकारने विशेष कार्यकारी अधिकारी नियुक्तीसाठी नवीन नियमावली जाहीर केली आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखालील समिती या नियुक्ती प्रक्रिया पाहणार आहे. समितीमध्ये संबंधित जिल्ह्यांचे पालकमंत्री आणि जिल्हाधिकारी सदस्य असतील. राज्य शासनाने प्रसिद्ध केलेल्या या नियमावलीत पात्रता निकष, जबाबदाऱ्या आणि निवड प्रक्रिया स्पष्ट करण्यात आली आहे. विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांची नियुक्ती पाच वर्षांसाठी करण्यात येईल. तसेच, नियुक्त अधिकाऱ्यांनी शासकीय योजनांचा प्रचार, आपत्ती व्यवस्थापन आणि कायदा-सुव्यवस्था राखण्यास मदत करण्याची ▶▶पान २ वर

# जरांगेंचा मुंडे-कराडबाबत खळबळजनक दावा

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणात गंभीर आरोप होत असलेल्या मंत्री धनंजय मुंडे यांचं भगवान गडाचे महंत नामदेव शास्त्री यांनी समर्थन केल्यामुळे मोठा वादंग निर्माण झाला आहे.राजकीय तसेच सोशल मीडियावरही त्यांच्याविरोधात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. अशातच देशमुख कुटुंबियांनीही शास्त्रींची भेट घेऊन त्यांना आरोपीं बाबत महत्त्वाची माहिती दिली आहे. याचदरम्यान,आता मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी धनंजय मुंडे यांच्याबाबत खळबळजनक विधान केलं आहे. मनोज जरांगे यांनी छत्रपती संभाजीनगरमध्ये सोमवारी(ता.३) माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी मोठा ▶▶पान २ वर

**म्हणाले, निवडणुकीच्या काळात ते रात्री २ वाजता मला भेटले**

## चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे

# महाकरंडक स्पर्धेचा थाटामाटात शुभारंभ



**बीड । प्रतिनिधी**

रंगदेवताची पालखी सजवून, टॅक्टर, बैलगाडीवरून असंख्य बीडच्या कलाकारांनी एकत्रित येऊन आकर्षक अशी शोभयात्रा काढत चंपावती नगरीचे लक्ष वेधले. काल दि.३ फेब्रुवारी २०२४ रोजी दुपारच्या सुमारास बीडच्या इतिहासत अखिल भारतीय नाट्य संमेलनाच्यानंतर चंपावती महोत्सवाच्या माध्यमातून कलाकारांची शोभयात्रा पहिल्यांदाच निघाली. या शोभायात्रेत पारंपरिक कलाकार, असंख्य बाल कलाकार जेष्ठ कलाकार आणि कलाप्रेमी यांनी मिळून शिवातीर्थावर वंदन करून नटराजाची पालखी वाजवत गाजवत मोठ्या थाटामाटात नाट्यमंदिरात आणली आणि नटराजाचे पूजन करून चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेचे उदघाटन करून मोठ्या थाटामाटात शुभारंभ केला. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खासदार डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या वाढ दिवसानिमित्त बीडमध्ये संपन्न होत असलेल्या चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेच्या उदघाटन समारंभ प्रसंगी व्यापारी महासंघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष मनमोहन ▶▶पान २ वर

